## निशाणी क्र. ३४ वरील आदेश

**१.** प्रस्तूत अर्ज वादींनी त्यांच्या विरूध्द झालेला पुरावा बंदचा आदेश रद्द करून मिळण्यासाठी दाखल केलेला आहे.

**२.** वादींनी त्यांच्या अर्जात असे कथन केले आहे की, वादीनां तारखेची समज न मिळाल्यामुळे त्याला त्याचा पुरावा सादर करता आला नाही. त्यामुळे, दिनांक ०४.०७.२०२३ रोजी त्यांच्याविरूध्द पुरावा बंदचा आदेश पारित झालेला आहे.

**३.** अर्ज व त्यावर प्रतिवादींनी दाखल केलेले म्हणणे वाचले. त्यात प्रतिवादींनी असे नमूद केले आहे की, वादींना अनेक संधी देवुनही त्यांनी पुरावा न दिल्याने निशाणी क्र. २४ खालील आदेशान्वये त्यांचा पुरावा बंद करण्यात आला. त्यामुळे, प्रतिवादींच्या वतीने सदरचा अर्ज नामंजुर करण्याची विनंती करण्यात आली.

**४.** वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान वकीलांचा युक्तीवाद श्रवण केला.

**५.** अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, वरील नमूद प्रतीवादींनी विहित वेळेमध्ये पुरावा दिला नसल्याने नि. क्र. २४ वरील दिनांक ०४.०७.२०२३ रोजीच्या आदेशानुसार त्यांच्या विरूध्द पुरावा बंदचा आदेश पारित करण्यात आलेला आहे. दाव्याचे स्वरूप व प्रस्तूत अर्जातील तथ्य विचारात घेता तसेच, नैसर्गिक न्याय तत्वानुसार उभय पक्षकारांना त्यांची बाजू मांडण्यासाठी पुरेशी संधी देणे आवश्यक आहे. प्रस्तुत प्रकरणाचा विचार करता सदरचे प्रकरण हे ०३ वर्षापेक्षा जुने आहे.

तसेच, प्रस्तुतचा दावा हा निरंतर ताकीदीसाठी असल्याने दाव्याचा निकाल गुणवत्तेवर लागण्याच्या दृष्टीने प्रस्तूत अर्ज मंजुर करून वादी क्र. १ व २ यांना पुरावा देण्याची परवानगी देणे योग्य व उचित होईल. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येतो.

**<u>आदेश</u>**

०१. अर्ज नि. क्र. ३४ मंजुर करण्यात येतो.

०२. वादींना पुरावा देण्याची परवानगी देवुन त्यांच्या विरूद्ध झालेला पुरावा बंदचा आदेश एकत्रीत रक्कम रू. २००/– चा खर्च प्रतिवादीस देण्याच्या अटीवर रद्द करण्यात येतो.

०३. वादींनी त्यांच्या विरूध्द झालेला खर्च आज अथवा पुढील तारखेच्या आत प्रतिवादीस द्यावा.

Digitally signed by VAIBHAV VASANTRAO JOSHI
Date: 2025.01.07 18:31:17 +0630

दिनांकः ०७/०१/२०२५. ( व्ही. व्ही. जोशी )
दिवाणी न्यायाधीश क. स्तर, जामखेड.